# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक १८/०२/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.चंद्रकांत गोरिवले सूचक :- मा.श्री.सुनील आचोळकर** |
| २ | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व फेरीवाल्याचे प्रभाग समिती निहाय बायोमॅट्रीक पद्धतीने सर्वेक्षण करण्यास मुदत वाढ बाबत. | **ठराव :-** वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत येऊन प्रस्तावनेत नमुद असलेप्रमाणे वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्थिर व अस्थिर फेरीवाल्यांचे बायोमॅट्रिक पध्दतीने सर्वेक्षण करणेकामी कार्यादेश दिल्यापासून ३१ मार्च, २०१६ पर्यंत अतिरिक्त मुदतवाढ देण्यास आजची मा. स्थायी समिती प्रशासकीय व वित्तीय मंजुरी एकमताने प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिकेस टेबल, खुर्च्या, कपाट व इतर फर्निचर पुरविणेकामाच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नव्याने स्थापित प्रभाग समिती कार्यालयासाठी टेबल, खुर्च्या, कपाटे व इतर फर्निचर व्यवस्था आवश्यकतेनुसार करावी लागणार आहे. तसेच मुख्यालय व महानगरपालिका अंतर्गत सर्व कार्यालये यांना आवश्यकतेनुसार टेबल, खुर्च्या, कपाटे व इतर फर्निचर खरेदी करुन पुरवठा करणेकामी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी वार्षिक ई निविदा दर मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ६० लक्ष पर्यंतचे खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरिवले** |
| ४ | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागांराची नियुक्ती करुन ई-निविदा मागविणेकामी मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागांराची नियुक्ती करणेकामी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून ई -कार्यप्रणालीद्धारे निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' अंतर्गत येणाऱ्या जुचंद्र विभागात भरणार दैनंदिन बाजार शुल्क वसुलीचा सन २०१६-१७ चा वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रशासकीय व आर्थिक | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' मधील जुचंद्र विभागात दैनंदिन बाजार शुल्क वसुलीसाठी ठेका देण्यांत येतो. सन २०१५-१६ या वार्षिक ठेक्याची मुदत ३१ मार्च, २०१६ ला संपुष्ठात येत आहे. सन २०१६-१७ वर्षाची ठेक्याची रक्कम रु. ७,२३,७८०/- असून सदर रकमेवर १०% वाढ करुन सन २०१६-१७ या वर्षाकरीता र. रु. ७,९६,१५८/- ( अक्षरी सात लाख शहाण्णव हजार एकशे अठ्ठावन्न रु. मात्र) तसेच सदर रकमेवर १४.०५% सेवाकर निश्चित करुन बाजार शुल्क वसुली वार्षिक ठेका काढण्यासाठी वृत्तपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता बाजार कर वसुली ठेका |

| | | |
|---|---|---|
| | मंजुरी मिळणेबाबत. | देण्याकरीता ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स    सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ६ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'आय' अंतर्गत येणारे मार्केट / बाजारपेठा सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता ठेका पद्धतीने देणेबाबत. | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करुन वरील दोन मार्केट / बाजारपेठा करीता देकार रक्कम अनुक्रमे र. रु. १३,६५,१००/- ८,४७,२४२/- अशी ठेवण्यांत आली असून या कामी रीतसर ई- निविदा दर पत्र मिळविणेस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरिवले    सूचक :- मा.श्रीम. मनिषा जाधव** |
| ७ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (एफ) धानिव/पेल्हार कार्यक्षेत्रातील १) बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड दैनंदिन बाजार २) मांडवी हद्दितील आठवडे बाजार वार्षिक ठेका पद्धतीने देणेबाबत. | **ठराव :-** सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (एफ) धानिव/पेल्हार कार्यक्षेत्रातील १) बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड दैनंदिन बाजार २) मांडवी हद्दितील आठवडे बाजार वार्षिक ठेका पद्धतीने देणेकामाच्या निविदा मागविणेकामी प्रशासकीय मंजुरी मिळविण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर  सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स** |
| ८ | नालासोपारा (प.) शुर्पारक मैदानावर ड्रेसींग रूम बांधणे कामी मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव** :- उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची मे. शार्प एन्टरप्रायजेस यांचे २.१११% कमी दराची निविदा प्राप्त झ् ाालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परीक्षक यांनी तपासून मंजुरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. शार्प एन्टरप्रायजेस यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसर अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे  सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स** |
| ९ | मा. स्थायी समिती सभा दि. १५/०५/२०१५ ठराव क्र. ५४४ च्या ठरावात अंशत: बदलास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- वरील प्रमाणे सदर प्रस्तावाबाबत सविस्तिर चर्चा होऊन मा. स्थायी समिती सभा दि. १५/०५/२०१५ ठराव क्र. ५४४ च्या ठरावात वरीलप्रमाणे अंशत: बदलास ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स    सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरिवले** |